# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## **साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**

लोकमत पुणे, रविवार, दि. २९ जानेवारी २०१७ ७

### ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हा

**मंजूषा कुलकर्णी :** 'उदात्त आपले ध्येय असावे' या विषयावर साधला संवाद

राजगुरुनगर : 'कोणत्याही व्यक्तीला देवत्वाकडे झुकायचे असेल, तर उत्तम ध्येय त्याच्यासमोर असायला हवे. त्यासाठी अखंड तपश्चर्या करून ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हायला हवे,' असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालक डॉ. मंजूषा कुलकर्णी यांनी येथे केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उदात्त आपले ध्येय असावे' या विषयावर तिसरे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.



- चांगल्या ध्येयासाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवा. ध्येय गाठण्यासाठी उत्तम वाचन हवे. वाचनामध्ये विचारांची उंची व गुणांची खोली असावी. ध्येयापर्यंत जाण्यासाठी सदैव धैर्यपूर्ण असायला हवे.
- ध्येयाकडे जाण्यासाठी नकारात्मक विचार मनातून काढून टाका आणि 'याच जन्मी फिरुनी पुन्हा जन्मेन मी' या ओळी कायम मनात ठेवून ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न करा."

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबराव बुट्टे-पाटील व्याख्यानमालेमध्ये बोलताना डॉ. मंजूषा कुलकर्णी.

डॉ. मंजूषा कुलकर्णी म्हणाल्या, "ध्येयप्राप्तीसाठी नम्रता हवी, अहंकार नको. माणसाने मोठे होत जाताना चांगल्या उदात्त ध्येयाने मन मोठं करायला हवं. खरा विद्यार्थी हा कधीच सुटी घेत नाही, तर सुटी ही त्याला काही नवीन शिकण्याची संधी असते. विद्यार्थ्यांच्या मनाला जोपर्यंत आशेचे पंख, हृदयात जिद्द आणि डोळ्यासमोर खुले आकाश असते तोपर्यंत प्रत्येक क्षण तुमचा आहे.

प्रा. धनंजय कोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ज्योती वाळुंज यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अमृता लोणारी हिने आभार मानले. (वार्ताहर)

सकाळ
पुणे, सोमवार ३० जानेवारी २०१७
५

### ध्येयप्राप्तीसाठी नम्रता हवी, अहंकार नको

राजगुरुनगरला व्याख्यानमालेत भाषा संचालक डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर, ता. २९ : 'उदात्त ध्येय आणि मोठे मन असल्याशिवाय उत्तुंग व्यक्तिमत्त्व आणि दीर्घ आयुष्य घडत नाही. ध्येयप्राप्तीसाठी नम्रता हवी, अहंकार नको,'' असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालक डॉ. मंजूषा कुलकर्णी यांनी केले.



डॉ. कुलकर्णी

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सुरू असलेल्या साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उदात्त आपले ध्येय असावे' या विषयावर त्या बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

त्या म्हणाल्या, 'माणसाने मोठे होत जाताना चांगल्या उदात्त ध्येयाने मन मोठे करायला हवे. खरा विद्यार्थी हा कधीच सुटी घेत नाही, तर सुटी ही त्याला काही नवीन शिकण्याची संधी असते. विद्यार्थ्यांच्या मनाला जोपर्यंत आशेचे पंख, हृदयात जिद्द आणि डोळ्यासमोर खुले आकाश असते तोपर्यंत प्रत्येक क्षण तुमचा आहे. माणसाला देवत्वाकडे झुकायचे असेल, तर उत्तम ध्येय त्याच्या समोर असायला हवे. अखंड तपश्चर्या करून ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हायला हवे.''

'चांगल्या ध्येयासाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवा. ध्येय गाठण्यासाठी उत्तम वाचन हवे. वाचनामध्ये विचारांची उंची व गुणांची खोली असावी. ध्येयापर्यंत जाण्यासाठी सदैव धैर्यपूर्ण असायला हवे,' असे त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन प्रा. धनंजय कोऱ्हाडे यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय प्रा. ज्योती वाळुंज यांनी करून दिला. आभार अमृता लोणारी हिने मानले.

...मवार, ३० जानेवारी २०१७ | पुणे
पुण्यनगरी

# ध्येयप्राप्तीसाठी नम्रता हवी; अहंकार नको

**डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचे आवाहन**



। राजगुरुनगर · प्रतिनिधी

ध्येयप्राप्तीसाठी नम्रता हवी, अहंकार नको, ध्येय गाठण्यासाठी अखंड तपश्चर्या करून ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हायला हवे, असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालक डॉ. मंजूषा कुलकर्णी यांनी केले.

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उदात्त आपले ध्येय असावे' या विषयावर त्या बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी पुढे म्हणाल्या, माणसाने मोठे होताना उदात्त ध्येयाने मन मोठे करायला हवे. खरा विद्यार्थी हा कधीच सुट्टी घेत नाही, तर सुट्टी त्याला काही नवीन शिकण्याची संधी असते. ध्येयाकडे जाण्यासाठी नकारात्मक विचार मनातून काढून टाका आणि 'एकाच या जन्मी फिरुनी पुन्हा जन्मेन मी' या ओळी कायम मनात ठेवून ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न करा, असे आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी तर परिचय प्रा. ज्योती वाळुंज यांनी केले. अमृता लोणारी हिने आभार मानले.

प्रभात पुणे, सोमवार, दि. ३० जानेवारी २०१७ 03

# ध्येय गाठण्यासाठी मन मोठे हवे

## डॉ. मंजुषा कुलकर्णी यांचे मत : राजगुरू महाविद्यालयात व्याख्यान



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उदात्त आपले ध्येय असावे' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. मंजुषा कुलकर्णी.

राजगुरुनगर, दि. २९ (प्रतिनिधी) - ध्येय गाठण्यासाठी अखंड तपश्चर्या करून ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हायला हवे, असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालक डॉ. मंजुषा कुलकर्णी यांनी केले.

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उदात्त आपले ध्येय असावे' या विषयावर त्या बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एस. पी. जाधव, पर्यवेक्षक जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

डॉ. मंजुषा कुलकर्णी म्हणाल्या, ध्येयप्राप्तीसाठी नम्रता हवी, अहंकार नको. माणसाने मोठे होत जाताना चांगल्या उदात्त ध्येयाने मन मोठे करायला हवं. खरा विद्यार्थी हा कधीच सुट्टी घेत नाही.' तर सुट्टी ही त्याला काही नवीन शिकण्याची संधी असते. विद्यार्थ्यांच्या मनाला जोपर्यंत आशेचे पंख, हृदयात जिद्द आणि डोळ्यासमोर खुले आकाश असते तोपर्यंत प्रत्येक क्षण तुमचा आहे. त्या पुढे म्हणाल्या की, चांगल्या ध्येयासाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवा. ध्येय गाठण्यासाठी उत्तम वाचन हवे. वाचनामध्ये विचारांची उंची व गुणांची खोली असावी. ध्येयापर्यंत जाण्यासाठी सदैव चैतन्यपूर्ण असायला हवे. ध्येयाकडे जाण्यासाठी नकारात्मक विचार मनातून काढून टाका आणि ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न करा असे प्रतिपादन त्यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. ज्योती वाळुंज यांनी केले तर कु. अमृता लोणारी हिने आभार मानले.

केसरी पुणे, २ फेब्रुवारी २०१७ ९

# ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हा : डॉ. मंजूषा कुलकर्णी

राजगुरुनगर : (वार्ताहर) कोणत्याही व्यक्तीला देवत्वाकडे झुकायचे असेल तर उत्तम ध्येय त्याच्या समोर असायला हवे त्यासाठी अखंड तपश्चर्या करून ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हायला हवे असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालक डॉ. मंजुषा कुलकर्णी यांनी केले. त्या साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उदात्त आपले ध्येय असावे' या विषयावर बोलत होत्या.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एस. पी. जाधव, पर्यवेक्षक जी. जी. गायकवाड, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात व्याख्यानमालेत बोलताना भाषा संचालक डॉ. मंजूषा कुलकर्णी. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर)

डॉ. मंजुषा कुलकर्णी बोलताना पुढे म्हणाल्या की, ध्येयप्राप्तीसाठी नम्रता हवी अहंकार नको. माणसाने मोठे होत जाताना चांगल्या उदात्त ध्येयाने मन मोठे करायला हवं. खरा विद्यार्थी हा कधीच सुट्टी घेत नाही तर सुट्टी ही त्याला काही नवीन शिकण्याची संधी असते. विद्यार्थ्यांच्या मनाला जो पर्यंत आशेचे पंख, हृदयात जिद्द आणि डोळ्यासमोर खुले आकाश असते तोपर्यंत प्रत्येक क्षण तुमचा आहे. त्या पुढे म्हणाल्या की, चांगल्या ध्येयासाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवा. ध्येय गाठण्यासाठी उत्तम वाचन हवे. वाचनामध्ये विचारांची उंची व गुणांची खोली असावी. ध्येयापर्यंत जाण्यासाठी सदैव चैतन्यपूर्ण असायला हवे. ध्येयाकडे जाण्यासाठी नकारात्मक विचार मनातून काढून टाका आणि एकाच या जन्मी फिरुनी पुन्हा जन्मेन मी' या ओळी कायम मनात ठेऊन ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न करा असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. ज्योती वाळुंज यांनी केले तर आभार कु. अमृता लोणारी हिने मानले.

जनप्रवास ५
शनिवार, दि. ४ फेब्रुवारी २०१७

# ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हा : डॉ. मंजुषा कुलकर्णी





राजगुरुनगर । वार्ताहर

कोणत्याही व्यक्तीला देवत्वाकडे झुकायचे असेल तर उत्तम ध्येय त्याच्या समोर असायला हवे त्यासाठी अखंड तपश्चर्या करून ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हायला हवे असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालक डॉ. मंजुषा कुलकर्णी यांनी केले त्या साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उदात्त आपले ध्येय असावे' या विषयावर बोलत होत्या.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक जी. जी. गायकवाड, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

डॉ. मंजुषा कुलकर्णी बोलताना पुढे म्हणाल्या की, ध्येयप्राप्तीसाठी नम्रता हवी अहंकार नको. माणसाने मोठे होत जाताना चांगल्या उदात्त ध्येयाने मन मोठं करायला हवं. खरा विद्यार्थी हा कधीच सुट्टी घेत नाही तर सुट्टी ही त्याला काही नवीन शिकण्याची संधी असते. विद्यार्थ्यांच्या मनाला जो पर्यंत आशेचे पंख, हृदयात जिद्द आणि डोळ्यासमोर खुले आकाश असते तोपर्यंत प्रत्येक क्षण तुमचा आहे. त्या पुढे म्हणाल्या की, चांगल्या ध्येयासाठी संपूर्ण व्यक्तिमत्व घडवा. ध्येय गाठण्यासाठी उत्तम वाचन हवे. वाचनामध्ये विचारांची उंची व गुणांची खोली असावी. ध्येयापर्यंत जाण्यासाठी सदैव चैतन्यपूर्ण असायला हवे. ध्येयाकडे जाण्यासाठी नकारात्मक विचार मनातून काढून टाका आणि एकाच या जन्मी फिरुनी पुन्हा जन्मेन मी' या ओळी कायम मनात ठेऊन ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न करा असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. ज्योती वाळुंज यांनी केले तर आभार कु. अमृता लोणारी हिने मानले.

संध्या शुक्रवार, दि. ३ फेब्रुवारी २०१७ ६

# ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हा -डॉ. कुलकर्णी



राजगुरुनगर, (किरण खुडे) - कोणत्याही व्यक्तीला देवत्वाकडे झुकायचे असेल तर उत्तम ध्येय त्याच्या समोर असायला हवे त्यासाठी अखंड तपश्चर्या करून ज्ञानाने, मानाने व मनाने मोठे व्हायला हवे असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालक डॉ. मंजुषा कुलकर्णी यांनी केले त्या साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उदात्त आपले ध्येय असावे' या विषयावर बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक जी. जी. गायकवाड, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

डॉ. मंजुषा कुलकर्णी बोलताना पुढे म्हणाल्या की, ध्येयप्राप्तीसाठी नम्रता हवी अहंकार नको. माणसाने मोठे होत जाताना चांगल्या उदात्त ध्येयाने मन मोठं करायला हवं. खरा विद्यार्थी हा कधीच सुट्टी घेत नाही तर सुट्टी ही त्याला काही नवीन शिकण्याची संधी असते. विद्यार्थ्यांच्या मनाला जो पर्यंत आशेचे पंख, हृदयात जिद्द आणि डोळ्यासमोर खुले आकाश असते तोपर्यंत प्रत्येक क्षण तुमचा आहे. त्या पुढे म्हणाल्या की, चांगल्या ध्येयासाठी संपूर्ण व्यक्तिमत्व घडवा. ध्येय गाठण्यासाठी उत्तम वाचन हवे. वाचनामध्ये विचारांची उंची व गुणांची खोली असावी. ध्येयापर्यंत जाण्यासाठी सदैव चैतन्यपूर्ण असायला हवे. ध्येयाकडे जाण्यासाठी नकारात्मक विचार मनातून काढून टाका आणि एकाच या जन्मी फिरुनी पुन्हा जन्मेन मी' या ओळी कायम मनात ठेऊन ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न करा असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. ज्योती वाळुंज यांनी केले तर आभार कु. अमृता लोणारी हिने मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख